महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०६ मे २०२५ ■ वर्ष ६ ■ अंक ३०७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव म्हसा धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

# बारावीच्या परीक्षेत ठाणे जिल्हा कोकण विभागात दुसरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दि. ०५ – फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, ठाणे जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन करत कोकण विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९३.७४% इतका लागला असून, एकूण ९६,०८९ विद्यार्थ्यांपैकी ८९,८२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मुलींचा निकाल ९२.९१% तर मुले ८९.५५% उत्तीर्ण झाले असून, मुलींची सरासरी कामगिरी मुलापेक्षा जास्त आहे. तसेच जिल्ह्यात ८७५० विदयार्थी यांनी फेरपरीक्षा दिली असून त्या पैकी ५४२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

"हा निकाल विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यांचा संगम आहे. परीक्षेत पारदर्शकता राखण्यासाठी घेतलेल्या उपाययोजनांचे हे यश आहे."
– रोहन घुगे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे



कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा – ठाणे जिल्ह्याची यशोगाथा

शिक्षण विभागाने यंदा परीक्षेच्या काळात परीक्षा केंद्रांवर शिस्त व पारदर्शकता राखण्यासाठी खालील उपाययोजना केल्या होत्या:

१. ड्रोन कॅमेराद्वारे संवेदनशील परीक्षा केंद्रांवर देखरेख.
२. परीक्षा केंद्रांवर सर्व भौतिक सुविधा पूर्वतयारीतच उपलब्ध.
३. परीक्षा केंद्रांच्या बाहेरील परिसरात व्हिडीओ चित्रीकरण.
४. भरारी पथके व बैठी पथकांची नियुक्ती – ३२ केंद्रांवर भरारी पथके कार्यरत.
५. Maharashtra Prevention of Malpractices Act 1982 अंतर्गत नियमावलीची कडक अंमलबजावणी.
६. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर बंद ठेवणे व कलम १४४ लागू करणे.

### निकालाचे ठळक मुद्दे:

- एकूण विद्यार्थी:९६०८९
- उत्तीर्ण विद्यार्थी: ८९८२७
- एकूण निकाल: ९३.७४%
- मुली: ४६,९६५ उत्तीर्ण / ५०,७१५ एकूण विद्यार्थी → ९२.९१%
- मुले: ४८,२८३ उत्तीर्ण / ५४,१२४ एकूण विद्यार्थी → ८९.५५%

"या वर्षीच्या परीक्षेमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि गुणवत्ता यांचा आदर्श ठाणे जिल्ह्याने घालून दिला आहे. कोणतीही अप्रिय घटना न घडता परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली, हे सर्व टीमवर्कचे फलित आहे." – ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

## जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे उच्च माध्यमिक परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवत नेत्रदीपक यश !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दि.५. गोवेली : कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील अग्रगण्य असे जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेली येथील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२५ च्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा कायम राखत नेत्रदीपक यश मिळविले आहे. यंदा महाविद्यालयातून सर्वाधिक ६११ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६०४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा एकूण ९९.०० % निकाल लागला आहे.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. रविंद्र घोडविंदे सरांनी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच या सर्व विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात करीअर करता येईल, अशा जीवनदीप महाविद्यालय गोवेली, खर्डी, म्हसा येथे सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन आपले व आपल्या पालकांचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहनही श्री. घोडविंदे सर यांनी केले.



**वाणिज्य शाखा ९८.१२ %**
- प्रथम – कु. गुणाई तन्वी मारुती – ८७.८३ %
- द्वितीय –कु. बोटकोंडले काजोल रमेश – ८६.८३ %
- तृतीय –कु. शेख वाहेबा कादिर – ८४.०० %
- चतुर्थ – कु.कोर भूमिका अंकुश – ७७.६७ %
- पंचम – कु. शहाणे अथर्व विकास – ७७.५० %

**कला शाखा ९६.७७ %**
- प्रथम – कु. शिसवे दिव्या नितलास – ८४.८३%
- द्वितीय – कु. टोहके कोमल प्रकाश – ८४.३३ %
- तृतीय – कु. लोणे हर्षाली दिनेश – ७१.१७ %
- चतुर्थ – कु. दळवी प्राची दिनेश – ७०.८३ %

**विज्ञान शाखा ९९.६४ %**
- प्रथम – शेख आफरीन फातिमा – ४८.०० %
- द्वितीय – काटकर प्रणव रमेश – ८५.०० %
- तृतीय – मिश्रा नमन सरोज – ८१.८३ %
- चतुर्थ – फत्ता पियुष सुभाष – ७९.१७ %
- पंचम – गायकर वैष्णवी विकास – ७८.३३ %
- पंचम: रसाळ श्रेया रविंद्र – ७८.३३ %

## जीवनदीप महाविद्यालय खर्डीचा ९७% निकाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय खर्डी (दळखण) इयत्ता बारावीचा कला ९२.२३% वाणिज्य १००% व विज्ञान ९९.३१% शाखेचा निकाल लागला असून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे, १. विज्ञान शाखा१) वाळिंबे जागृती प्रकाश-८०.५0%२.कला १)जैस्वाल अनामिका अछेलाल - ७५.००%३)वाणिज्य १) बागुल ऋग्वेद अनंता ७१.३३% उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे, श्री. प्रशांत घोडविंदे, श्री अनिल घोडविंदे,पालक संघ प्रमुख श्री नरेश जाधव ,प्र.प्राचार्य प्रा कैलास कळकटे , प्राध्यापक वृंद प्रा,दीपक विशे सर ,प्रा.माधुरी पाटील मॅडम ,प्रा राजन धसाडे सर ,प्रा संदेश गायकवाड सर,प्रा सरिता केदारी मॅडम, प्रा साक्षी मोकाशी मॅडम,प्रा. माया बरतड मॅडम,प्रा.राहुल सोनवणे सर प्रा. सोनाली शेलार मॅडम यांनी अभिनंदन केले.व भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सर्व राज्यांत 'मॉक ड्रिल' घ्या ! केंद्रीय गृहमंत्रालयाचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

जम्मू-काश्मीर मधील पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढंच नाही तर पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल झाल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. यातच आता केंद्रीय गृहमंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना महत्वाचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, यानंतर आता आजही दिवसभर दिल्लीत बैठकांचा धडाका सुरू असल्याचं पाहायला मिळाल. यातच आता केंद्रीय गृहमंत्रालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने भारतातील सर्व राज्यांना ७ मे रोजी नागरी संरक्षणासाठी 'मॉक ड्रिल' घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

भारतातील सर्व राज्यांना नागरी संरक्षणाच्या पार्श्वभूमीवर ७ मे रोजी 'मॉक ड्रिल' घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये या दिवशी सर्व राज्यांत सायरन वाजले जातील. जेव्हा हल्ला होतो, तेव्हा सूचना देण्यासाठी सायरन वाजवले जातात. मात्र, सर्व राज्यातील सुरक्षा यंत्रणा सज्ज आहे की नाही? किंवा सुरक्षा यंत्रणा तपासण्यासाठी या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती सांगितली जात आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. त्यामुळे दिल्लीत हालचाली वाढल्याचं दिसून येत आहे. रविवारी भारताच्या हवाई दल प्रमुखांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताच्या नौदल प्रमुखांनी देखील भेट घेत पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात चर्चा केल्याचं सांगितलं जातं.

## बदलापूर आणि अंबरनाथ शहरांना वाढीव दराने पाणी ?

### भाजप माजी नगरसेवकाचा मजीप्रावर गंभीर आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

> जीवन प्राधिकरणावर यापूर्वीही आरोप झाले आहेत. आरोप करणाऱ्यांनी हे जाणून घ्यावे की, बदलापूर आणि अंबरनाथ या दोनच शहरात वाढीव दर आकारले जात नाहीत. जीवन प्राधिकरण महाराष्ट्र बोर्ड या संदर्भात निर्णय घेऊन दर आकारत असते. आम्ही फक्त निर्णयाची अंमलबजावणी करतो. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, अंबरनाथ आणि बदलापूर नगर परिषदांनी पाणी वितरण सेवा आपल्या हातात घ्यावी. आम्ही ती द्यायला तयार आहोत. दोन्ही नगर परिषदा ही सुविधा पुरविण्यास तयार असतील तर, तसा प्रस्ताव त्यांनी राज्य सरकारकडे सादर करावा. त्यावर जो निर्णय होईल त्यानुसार सहकार्य करु.
> ● मिलिंद देशपांडे, अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंबरनाथ

**बदलापूर, ता. ५ :** उपनगरात झपाट्याने शहरीकरण होत असलेल्या अंबरनाथ आणि बदलापूर शहरातील नागरिक सर्वात महागडे पाणी पित आहे.

पाणीपुरवठा हा 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर असतो. मात्र, फक्त नफ्यासाठी राज्यातील या दोन शहरांना महाग पाणी दिले जात आहे. राज्यात इतर शहरांच्या तुलनेत पाण्याचे दर जास्त आकारून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बदलापूर व अंबरनाथ शहरातून दरवर्षी १० कोटी रुपयांचा नफा प्राप्त करत आहे, अशी माहिती भाजपचे ठाणे जिल्हा महामंत्री आणि माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून अंबरनाथ आणि बदलापूर या दोन शहरांना पाणीपुरवठा केला जातो. या संपूर्ण पाणीपुरवठा कारभारात प्राधिकरण येथील पाणी वितरण, देखभाल दुरुस्ती, जल उदंचन, जल शुद्धीकरण प्रकल्प चालवणे अशी कामे करते. वास्तविक महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगर परिषदा आणि महानगरपालिका यांच्याकडे स्वतःचा पाणीपुरवठा विभाग आणि नियंत्रण आहे.

या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था या पाणी योजनांसाठी; तसेच पाणीपुरवठ्यासाठी स्वनिधी आणि उत्पनातून खर्च करून नागरिकांना सवलतीच्या दरात पाणीपुरवठा करत असतात. किंबहुना अत्यावश्यक गरज असलेल्या पाणीपुरवठ्यासाठी 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावरच हा कारभार चालवायचा असतो; मात्र मजीप्रा बदलापूर आणि अंबरनाथ शहरातून दरवर्षी १० कोटी रुपयांचा निधी (नफा) प्राप्त करत आहे, असा दावा संभाजी शिंदे यांनी केला आहे.

या शहरांत पाणीगळती सुमारे ३० टक्के असून, भांडवली कामांसाठी प्राधिकरण कोणताही खर्च करत नाही, असा आरोपही शिंदे यांनी केला आहे. दिवसाआड पाण्याची समस्या असलेल्या या दोन्ही शहरात जीवन प्राधिकरणाच्या कामावर नागरिकांनी मोठी नाराजी व्यक्त केलेली आहे.

पाण्याची गळती कमी करण्यासाठी भांडवली खर्च केला जात नाही. आवश्यक तांत्रिक मनुष्यबळाची व्यवस्थाही केली जात नाही. अंबरनाथ नगरपालिका, बदलापूर नगरपालिका यामधील विकासकामांना तांत्रिक मंजुरी देण्याची प्रक्रियाही मजीप्राचे अस्तित्वातील मनुष्यबळ (स्थापत्य, विद्युत अभियंते) करत आहेत.

त्यातूनही मजीप्राला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. तोदेखील शहरातील पाणीपुरवठा सुरळीत, सक्षम व गळतीमुक्त करण्यासाठी भांडवली खर्च करण्यासाठी वापरणे गरजेचे आहे. त्यामुळे स्टेमच्या धर्तीवर प्राधिकरण स्थापन करण्यात यावी, अशी मागणी शिंदे यांनी केली आहे.

## भिवंडीत सापडल्या तीस लाखांच्या बनावट नोटा

### ठाणे पोलिसांच्या कारवाईत तीन जण अटकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** भिवंडी येथे ३० लाख रुपये किमतीच्या बनावट नोटा ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेने जप्त केल्या आहेत. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सुरज शेंडे (३२), भारत सासे (३८) आणि स्पप्रील पाटील (३८) अशी आरोपींची नावे असून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे.

भिवंडी येथील अवचितपाडा परिसरात काहीजण भारतीय बनावटीचे चलन घेऊन येणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या भिवंडी युनीटला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पथकाने शनिवारी रात्री अवचितपाडा येथे सापळा रचला. अवचितपाडा येथे रिक्षामधून तीन जण बनावट नोटा घेऊन आले.

पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी त्यांची नावे सुरज शेंडे, भारत सासे आणि स्पप्रील पाटील असल्याचे सांगितले. त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडील बॅगेत ५०० रुपये किमतीच्या बनावट नोटा आढळून आल्या. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी या नोटा बनावट असल्याची कबूली दिली.

दरम्यान, पोलिसांनी पडताळणी केली असता नोटा बनावट असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलिसांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १७८, १८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.




## पूरमुक्त शहर योजनेला परवानग्यांचा अडसर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. ५ (बातमीदार) :** पावसाळ्यात मिरा-भाईंदर शहरात अनेक सखल भागात पाणी तुंबून पूरस्थिती निर्माण होते. यावर मात करण्यासाठी महापालिकेने पूरमुक्त शहर ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. योजनेअंतर्गत विविध उपाययोजना राबविण्यासाठी महापालिकेला तब्बल १४९ कोटींची आवश्यकता आहे, मात्र हा निधी महापालिकेला उपलब्ध होत नसल्याने ही योजना यावर्षी कागदावरच राहण्याची शक्यता आहे. मिरा-भाईंदर शहर तीन बाजूंनी खाडीने वेढलेले आहे, तर एका बाजूला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची हद्द येते. पावसाळ्यात शहरातील मुख्य नाल्यांद्वारे पाणी छोट्या खाड्यांना व नंतर समुद्राला जाऊन मिळते. या काळात राष्ट्रीय उद्यानातील डोंगरावरून येणारे पाणीदेखील मोठ्या प्रमाणात नाल्यांमध्ये येऊन खाडीत जाते, मात्र मुसळधार पावसात समुद्राला मोठी भरती असेल, तर नाल्यातील पाणी खाडीत न जाता शहरातच तुंबून राहाते. उलट समुद्राचे भरतीचे पाणी नाल्यांद्वारे शहरात शिरून पूरस्थिती निर्माण होते. यावर मात करण्यासाठी महापालिकेने पूरमुक्त शहर योजना तयार केली आहे. यासाठी शहराचे शास्त्रशुद्ध सर्वेक्षण करण्यात आले व पाणी तुंबू नये, यासाठी आराखडा तयार करण्यात आला. यात प्रामुख्याने नाल्यांच्या तोंडांवर २१ ठिकाणी यांत्रिक झडपा बसविण्यात येणार आहेत. या झडपा नाले ज्या ठिकाणी खाडीला मिळतात, त्या ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.

हे नाले सीआरझेड क्षेत्रात येत असल्याने नाल्यातील तिवरांची झाडे काढण्यासाठी महापालिकेने सीआरझेड प्राधिकरणाची परवानगी प्राप्त केली आहे, तर कांदळवन कक्ष, वन विभाग व उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याचे काम सुरू आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने योजनेसाठी येणारा खर्च महापालिकेला पेलवणारा नाही. यासाठी महापालिकेने राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पत्रव्यवहार करून पूरमुक्त शहर योजनेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे, मात्र या विभागाकडून गेल्या दोन महिन्यांत कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. आता पावसाळा अगदी एक महिन्यावर येऊन ठेपला आहे, परंतु निधी न मिळाल्याने पूरमुक्त शहर योजनेतील कामे यावर्षी राबविणे महापालिकेला शक्य होणार नसून यंदाही शहरात मोठ्या प्रमाणात पाणी तुंबण्याची शक्यता आहे.



## गीतासार



### अध्याय १०
### विभूतियोगः

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः । याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १०-१६ ॥

म्हणून ज्या विभूतींच्या योगाने आपण या सर्व लोकांना व्यापून राहिला आहात, त्या आपल्या दिव्य विभूती पूर्णपणे सांगायला आपणच समर्थ आहात. ॥ १०-१६ ॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् । केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ १०-१७ ॥

हे योगेश्वरा, मी कशाप्रकारे निरंतर चिंतन करीत आपल्याला जाणावे आणि हे भगवन्, आपण कोणकोणत्या भावांत माझ्याकडून चिंतन करण्यास योग्य आहात? ॥ १०-१७ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन । भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १०-१८ ॥

हे जनार्दना (अर्थात श्रीकृष्णा), आपली योगशक्ती आणि विभूती पुन्हाही विस्ताराने सांगा. कारण आपली अमृतमय वचने ऐकत असता माझी तृप्ती होत नाही. अर्थात ऐकण्याची उत्कंठा अधिकच वाढत राहाते. ॥ १०-१८ ॥

श्रीभगवानुवाच हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः । प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥ १०-१९ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे कुरुश्रेष्ठा (अर्थात कुरुवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), आता मी ज्या माझ्या दिव्य विभूती आहेत, त्या मुख्य मुख्य अशा तुला सांगेन. कारण माझ्या विस्ताराला शेवट नाही. ॥ १०-१९ ॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः । अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥ १०-२० ॥

हे गुडाकेशा (अर्थात अर्जुना), मी सर्व भूतांच्या हृदयात असलेला सर्वांचा आत्मा आहे. तसेच सर्व भूतांचा आदी, मध्य आणि अंतही मीच आहे. ॥ १०-२० ॥

## आरोग्य
### ॲनिमिया



**हिरव्या पालेभाज्या रक्त** – अशक्तपणा असल्यास, महिलांनी त्यांच्या आहारात मेथी, पालक यासारख्या हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा. त्यामध्ये लोह, पोटॅशियम, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन सी सारखे अनेक पोषक घटक आढळतात जे हिमोग्लोबिन वाढवण्यास मदत करतात.

**सुकामेवा आणि काजू** – अशक्तपणा असल्यास, तुमच्या आहारात बदाम, अक्रोड, पिस्ता, अंजीर यांसारखे सुके फळे समाविष्ट करा. त्यामध्ये लोह आणि मॅग्नेशियम सारखे पोषक घटक आढळतात, जे अशक्तपणावर मात करण्यास मदत करतात.

**लिंबूवर्गीय फळे** – महिलांनी त्यांच्या आहारात संत्री, गोड लिंबू, लिंबू, किवी, स्ट्रॉबेरी आणि पपई यांसारखी व्हिटॅमिन सी समृद्ध लिंबूवर्गीय फळे समाविष्ट करावीत.

**बीटरूट आणि गाजर** – ज्या महिलांमध्ये हिमोग्लोबिन कमी आहे त्यांनी त्यांच्या आहारात बीट आणि गाजर यांचा समावेश करावा. कारण बीट हे लोहाचा चांगला स्रोत आहे जे रक्त वाढवण्यास मदत करते, तर गाजर हे व्हिटॅमिन ए आणि फायबरचा चांगला स्रोत आहे जे रक्त स्वच्छ करते.

# लोककल्याणकारी राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज



आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०३ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# वाशीनाका येथे उड्डाणपुल उभारणे गरजचे – सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** सुमारे १०ते १२ वर्षा पासून कासवाच्या गतीने सुरू असलेलं मुंबई गोवा हायवे पूर्णत्वास जाण्याचे नाव नाही.तारीख पे तारीख काहीसे आहे. माञ कोकणवासीयांवर अन्याय होतोय हे नक्कीच.....

आत्ताचे काँक्रीटीकरण सुमार दर्जाचे आहे,कित्येक ठिकाणची परिस्थिती भयाण असेल पावसाळ्यात हे नाकारू शकत नाही.खारेपाट विभागात वाशीनाका ते वाशी ही नवीन वसाहत मध्यम काळेश्री 'कान्होबा' भाल मोठे भाल तुकाराम वाडी, जनवली , नारवेल , बेनवले ,घोडाबंदर ,बहीराम कोटक, तामसी बंदर ,मळेघरवाडी,वढाव,दिव,कणे,बोर्झे लाखोले या गावासह अनेक वाड्या आहेत. या ठिकाणी असणारी लोकसंख्या लक्षात घेता वाशीनाका येथील रस्ता क्रॉस करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अनेक नागरिकांची गैरसोय होत आहे.एव्हढेच नव्हे तर ही क्रॉसिंग मृत्यूचा सापळा ठरला आहे.मागील २०१० तर २०२२ ही उपलब्ध आकडेवारी हे भयाण चित्र दाखविते.या वर्षात ५७५ दाखल अपघात त्यामध्ये ६२७ जखमी,२६२ मयत झाले आहेत.२०२३ ची आकडेवारी गृहीत नाही.ज्यांची कमावती व्यक्ती मरण पावलेली आहे त्यांचे कुटुंब त्यांच्या वेदना भविष्यात त्यांना येणारी संकटे ही रस्ते अपघाताचा परिणाम आहे.आत्ता कधीतरी हा काँक्रीटीकरण पूर्ण होईल मग सुसाट वेगाने गाड्या जातील जर उड्डाण पुल झाला नाहीतर वाशी खारे पाट विभागाला शाप ठरेल...हे नक्कीच.माझे पेण या संघटनेने रास्तारोको आंदोलन केले त्यावेळी या उड्डाण पुलाची मागणी केली होती आणि एक वर्षापूर्वी राष्ट्रीय महामार्ग अधिकारी गौरांग बाडगे, शत्रुघ्न सिंग, विशाल गायकर हे वाशी नाका येथे येऊन पाहणी केली यावेळी सर्व नकाशा तयार करून पिलर वर उड्डाण पुल करण्यासाठीचा अहवाल केंद्राकडे पाठविण्याचे मान्य केले..यावेळी माझे पेण चे सदस्य, खारेपाट ग्रुप चे सदस्य उपस्थित होते.मात्र तीन चार वर्ष होऊन सुध्दा प्रश्न सुटणार केव्हा असा प्रश्न नागरीक विचारत आहेत. आज नीतीला सर्विस रोड प्रत्येक ठिकाणी झालेले दिसतात मात्र वाशी नाका सर्विस रोड अपूर्ण.आहे.जर का पावसाळ्यापूर्वी तो रस्ता पूर्ण झाला नाही तर त्या खड्डयामध्ये पाणी चिखल साठेल अंधारात खड्डे दिसणार नाहीत आणि त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे...

हमरापूर फाटा,जिते येथे ज्या प्रकारे नागरिकांची सुरक्षितता पाहिली आहे तशी खारेपाट विभागातील नागरिकांची सुरक्षितता पाहिली जावी.

या मार्गावर दररोज विभागातील सर्व पक्षाचे नेते,सदस्य,कार्यकर्ते ये जा करत असतात.त्यांनी एकजुटीने आपल्या नेत्यांकडे मागणी लाऊन धरली तर हे उड्डाण पुलाचे काम होईल यात शंका नाही यासाठी खासदार सुनिल तटकरे खासदार धैर्यशील पाटील व आमदार रविंद्र पाटील यांनी तातडीने लक्ष घालून हा प्रश्न धसास लावला पाहिजे अशी मागणी होत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी दिली.

# प्रभागातील कार्यकर्त्यांकडून राजन मराठे यांचा वाढदिवस साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** सुप्रसिद्ध उद्योजक, ज्येष्ठ नागरिकांचे आणि प्रभागातील सर्व मतदारांचे, मित्र मंडळींचे लाडके नगरसेवक म्हणजेच श्री राजन मराठे, माजी नगरसेवक, जनमित्र, असेच राजन मराठे यांची ओळख आहे यांचा वाढदिवस प्रभागाचे कार्यकर्त्यांनी मित्र मंडळींनी प्रभागातील



कार्यालयात जल्लोषात साजरा केला.राजन मराठे आणि त्यांचे कुटुंबीय आणि सर्व मित्र मंडळी सोबत त्यांनी केक कापला आहे आपला आनंद उत्सव साजरा केला. राजन मराठे यांच्या वाढदिवसाकरिता शुभेच्छा देण्यासाठी आमदार राजेश मोरे, आणि अनेकशिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.मराठे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राजकीय, सामाजिक, आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक हितचिंतकांनी उपस्थिती लावली होती.

# महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी सेनेच्या शहर कार्याध्यक्ष पदी रूपेश भोईर यांची नियुक्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) चे कल्याण विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांची महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी सेनेच्या कल्याण शहर कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी सेनेचे ठाणे जिलाध्यक्ष आणि माजी महापौर रमेश जाधव यांनी रूपेश भोईर यांना नियुक्ती पत्र दिला आहे. विभिन्न सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य सेवेत काम करणारे रूपेश भोईर यांनी वेळो वेळी रिक्षा आणि टैक्सी चालकांना न्याय मिळवून दिलेला आहे. सोबतच कल्याण (प ) येथील रेलवेच्या हद्दीत असलेल्या आणि बंद पडलेल्या



रिक्षा स्टैन्ड ला पुनः सुरू करण्या साठी विशेष प्रयत्न केलेले आहेत. त्याचीच पोच पावती म्हणून महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी सेनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष आणि माजी महापौर रमेश जाधव यांनी महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी सेनेचे सरचिटणीस गोपाळ नवगिरे यांच्या उपस्थितीत रूपेश भोईर यांची नियुक्ती कल्याण शहर कार्याध्यक्ष पदी केली आहे. नियुक्ती पत्र देताना जाधव यांनी रूपेश भोईर बद्दल आपले मनोगत व्यक्त करताना सांगितलं की रूपेश भोईर यांची कार्यपद्धती पक्षा साठी आणि संघटने साठी महत्वाची आहे. ह्या वेळी रूपेश भोईर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगीतले की सदरची जवाबदारी मी योग्य रीत्या पार पाडेन आणि रिक्षा-टॅक्सी चालकांच्या प्रत्येक समस्येचा निदान करण्याचा प्रयत्न करेन .रूपेश भोईर यांच्या नियुक्ती चे शिवसेना वाहतुक सेनेचे शहर अध्यक्ष निलेश भोर यांनी स्वागत केलं आहे आणि पुढच्या वाटचाल साठी शुभेच्छा दिल्या.

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते
# ५० दिवसीय योग क्रांती उपक्रमाचे उद्घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर, 'योग सर्वांसाठी' हे ध्येय पुढे ठेवत केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालया अंतर्गत, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना सेल,आरोग्य योगा व नॅचरोपॅथी सेंटर, जीवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एसएसटी महाविद्यालय आणि जीवनदीप महाविद्यालय यांच्या आयोजनातून ५० दिवसीय योग क्रांतीकारी उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, "योग ही भारताची प्राचीन परंपरा असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नातून तो आता जागतिक स्तरावर पोहोचला आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत योग पोहोचवण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे." या प्रसंगी मुरबाड-बदलापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांनीही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र व गोवा क्षेत्रीय संचालक प्रमुख अजय शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष - राज्य संपर्क अधिकारी महाराष्ट्र शासन डॉ. निलेश पाठक, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ओएसडी प्रा. सुशील शिंदे, तसेच ठाणे जिल्हा समन्वयक व एसएसटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. जीवन विचारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य योगा आणि नॅचरोपॅथी सेंटरचे संस्थापक डॉ. विजय कुकरेजा यांनी तर सूत्रसंचालन प्रा. जीवन विचारे यांनी केले. आभार प्रदर्शन विभागीय समन्वयक प्रा. नीरज मिश्रा यांनी केले. संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांपासून नागरिकांपर्यंत योगाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचा उद्देश असलेल्या या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

# जी एस महानगर बँकेची रणधुमाळी

### संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके पॅनल जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** जी एस महानगर बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली असून बँकेच्या अध्यक्षा श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली " संस्थापक अध्यक्ष सॉलिसीटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके " पॅनल " उभा करण्यात आला आहे , अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी दिली आहे .जी



एस महानगर बँकेचा १९७३ साली सुरू झालेला हा प्रवास एका छोट्याशा ९ बाय १८ चौरस फूट खोलीतून झाला , परंतु ही केवळ बँकेची कहाणी नाही, ही आहे एका स्वप्नाची कथा, जी माझे पती सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब आणि त्यांचे सहकारी यांनी प्रत्यक्षात आणली.

आज जी एस महानगर बँक संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारली आहे . बँकेचे ८० हजार ४१० भागधारकांचा बँकेवर ठाम विश्वास असून ६८ कोटी ६१ भाग भांडवल आहे . २ हजार ८८४ कोटींची भक्कम ठेव असून राज्यभर ७० शाखांचा विस्तार झालेला आहे .

जी एस महानगर बँकेचे हे यश विश्वासाचं, जिद्दीचं आणि सामूहिक प्रगतीचं प्रतीक आहे. "आपली बँक ही , फक्त बँक नाही, तर लोकांसाठी, लोकांनी उभी केलेली चळवळ आहे .

जी एस महानगर बँकेच्या भवितव्यासाठी , दिवंगत गुलाबराव शेळके व ॲड उदय शेळके यांच्या स्वप्नांची पुर्ती म्हणजे त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली च होय , " संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके " पॅनलच्या विचारांना पाठिंबा द्यावा , जीएस महानगर बँकेचे सर्व ग्राहक , हितचिंतक आणि ठेवीदारांमुळे हे शक्य झाले आहे , त्यामुळे मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानत असल्याचे , मत , बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी व्यक्त केले आहे .

## तहसिलदारांच्या खुर्चीत शिपाई..!
# ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर तातू ठाकरेंचा अनोखा गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुरबाड तहसील कार्यालयात 36 वर्षांहून अधिक काळ शिपाई म्हणून अविरत सेवा करणारे तातू ठाकरे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा अनोख्या पद्धतीने गौरव करण्यात आला. दि.30 एप्रिल या निवृत्तीच्या दिवशी, तातू ठाकरे यांना खुद्द तहसिलदार अभिजित देशमुख यांनी आपल्या खुर्चीत बसवून त्यांच्या कार्याचा सन्मान केला. 1989 मध्ये शिपाई म्हणून रुजू झालेले तातू ठाकरे आपल्या कामाप्रती नेहमीच निष्ठावान राहिले. कार्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याशी त्यांचे आपुलकीचे संबंध होते. त्यांच्या निवृत्तीच्या दिवशी कार्यालयात एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी तहसिलदार अभिजित देशमुख म्हणाले की, "तातू ठाकरे यांनी 36 वर्षांहून अधिक काळ कार्यालयात अत्यंत निष्ठेने काम केले. त्यांनी कधीही वेळेची किंवा कामाची तक्रार केली नाही. शिपाई म्हणून काम करत असतानाही त्यांनी नेहमीच आपले कर्तव्य चोखपणे बजावले. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ आणि मदतनीस असल्याने ते सर्वांचेच लाडके होते."

ते पुढे म्हणाले, "आज त्यांच्या निवृत्तीचा दिवस आहे आणि त्यांच्या या प्रदीर्घ सेवेचा सन्मान म्हणून मी त्यांना माझ्या खुर्चीत बसविण्याचा निर्णय घेतला. त्यांनी कार्यालयासाठी जे काही केले आहे, त्याची परतफेड पैशांमध्ये होऊ शकत नाही, पण हा एक छोटासा प्रयत्न आहे त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा."

या अनोख्या सन्मानामुळे तातू ठाकरे भावुक झाले होते. त्यांनी तहसिलदार श्री.देशमुख आणि कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि कृतज्ञता स्पष्ट दिसत होती.

तातू ठाकरे यांच्या या गौरवशाली निरोपाने कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये एक सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची ही कहाणी निश्चितच इतरांनाही प्रेरणा देईल.




## आयसीएसई (१० वी) बोर्ड परीक्षेत
# डोंबिवलीतील यशस्वी शैलेश देसाईला ९७.८० टक्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** आयसीएसई ( 10 वी ) बोर्ड परीक्षेत डोंबिवलीतील यशस्वी शैलेश देसाईला 97.80 टक्के मिळविल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. ओम इंग्लिश स्कुल मध्ये शिकलेलल्या यशस्वी आई वडील, गुरुजन यांच्यामुळे हे यश मिळण्याचे सांगते. क्लास न लावता घरीच अभ्यास करून चागले गुण आणल्याने तिच्या नातेवाईकांकडून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अभ्यासाबरोबर यशस्वीला चित्रकेलेची आवड आहे. घरी चित्र काढताना पाहून तिचे आई वडील खूप खुश होत असतात. पुढे मेडिकल फिल्ड मध्ये करियर करायचे आहेअसे यशस्वी म्हणते. तिची आई गृहिणी असूज वडील इलेट्रीयन आहेत. यशस्वीची लहान बहीणही खूप हुशार असून आपल्या ताईसारखे 10 विला चागले गुण मिळवू असे म्हणाली. तिची मामे बहीण ज्ञानश्री गदरे हिने तिला शुभेच्छा देताना सांगितले की, यशस्वी ही लहानपणा पासूनच अभ्यासात हुशार आहे. आमच्या घरी आली अभ्यासच करत असायची. तिला हॉलीबॉल हा खेळ खूप आवडत असून शाळेत कॅप्टन होती.



# पावसाळ्यापुर्वीची नालेसफाई न झाल्याने पुरपरिस्थितीची शक्यता ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्यापही अंतर्गत तसेच मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या नाल्यांची पावसाळ्यापुर्वी नालेसफाई न झाल्याने बहुतांश सखल भागात पाणी साचून नागरिकांना त्रास होणार आहे तसेच कल्याण मुरबाड मार्गावरील अर्धवट कामे यामुळे रस्ते अपघातासह,नदी काठच्या गावामध्ये पुरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता अधिक वर्तवली जात आहे. दरवर्षी पावसाळयात म्हारळ, वरप, कांबा, मानिवली, रायते, पावशेपाडा, आणे, भिसोळ, खडवली, रुंदा, आदी गावांना पुराचा फटका बसतो, या परिसरात बिल्डर मंडळींनी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करून इमारती उभ्या केल्याने नैसर्गिक पाण्याचा निचरा होण्यात अडथळा निर्माण होणार आहे, अशातच अनेक गावातील अंतर्गत तसेच मुख्य रस्त्याच्या दुतर्फा गटारे, कचरा, माती, प्लास्टिक, आदी वस्तूंनी खचाखच भरले आहेत, तर मोठमोठे असणारे नैसर्गिक नाल्यांचे आता छोटया



छोटया गटारात रुपांतर झाले आहे.कल्याण मुरबाड महामार्गावर दुतर्फा बांधलेली बंदिस्त गटारे केवळ नावापुरती उरलेली आहेत,म्हारळ, वरप, कांबा, या ठिकाणी यावरील झाकणांनी खूप वेगवान प्रवास केल्याचे दिसून येत आहे. दोन्ही बाजूची ही गटारे किंवा नाले, दगड धोंडे, लाद्या, कचरा, माती, यांनी भरलेली आहेत, त्यामुळे यातून पावसाचे पाणी कसे वाहून जाणार हा खरा प्रश्न आहे.

पुढे वाघेरापाडा, पांजरापोळ, रायते, गोवेली, मामणोली, किशोर, घोरला, धानिवली,मुरबाड, इकडे गोवेली फळेगावा रस्त्यावर टिटवाळा, वारघडे नगर, रुंदा पुल, इत्यादी ठिकाणी रस्ता अर्धवट सोडून दिला आहे, अनेक ठिकाणी डिवाईडर लावलेले नाही, रस्त्यावर धूळ तशीच आहे,या सर्वाचा परिणाम रस्ता अपघातात होऊ शकतो. तालुक्यातील अनेक गावात इमारतींची कामे सुरू आहेत, त्यामुळे या बिल्डर लोकांनी मोठ मोठे खड्डे खोदून ठेवले आहेत, यामध्ये लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, यांना धोका संभवतो. अशा घटना घडल्या आहेत. तसेच रस्त्याच्या बाजूला , गावामध्ये अनाधिकृत होर्डिंग लावलेले आहेत यामुळे देखील जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर प्रशासनाने वेळीच उपाययोजना करायला हवी. नागरिकांचे जीव जाण्याची वाट पाहू नये.

### आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी

# कृत्रिम बुद्धिमतेचे योगदान

### – अपर आयुक्त गोपीचंद कदम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या सहा प्रकल्पातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांची विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत व शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर दि.29 एप्रिल रोजी एक दिवसीय कार्यशाळा आत्मा मलिक शैक्षणिक संकुल, मोहिली अघई, तालुका शहापूर येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे गोपीचंद कदम (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहापूर आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, पेण आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. काळपांडे, सप्रअ (शि) पवन पाटील तसेच ठाणे अप्पर आयुक्त कार्यालयाच्या लेखाधिकारी कविता देशपांडे व सप्रअ (शि) जगदीश पाटील, सर्व प्रकल्पातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) विस्ताराधिकारी व सहाही प्रकल्पातील 258 मुख्याध्यापक उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात लेखाधिकारी श्रीमती देशपांडे यांनी लेखा, रोखवही, प्रलंबित परिच्छेद, अभिलेखे याबाबत मार्गदर्शन केले. नंतर व्हीजेटीआय महाविद्यालय मुंबई येथील प्राध्यापक संदीप उदमले यांनी शिक्षणात एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर याविषयी मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले.दुपारच्या सत्रात पुणे येथील युवा वक्ते सुनील धनगर यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना ओघवत्या शैलीने कर्तव्य, समाधान व जबाबदारी या विषयी प्रेरित केले. त्यानंतर शहापूर आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री.हिवाळे यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढ व वसतिगृह व्यवस्थापन प्रवेशोत्सव, क्रीडा याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

समारोपीय मार्गदर्शनात अप्पर आयुक्त श्री.कदम यांनी दैनंदिन अध्यापनात तसेच कार्यालयीन वापरात एआयचा वापर करण्याविषयी आवाहन केले तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करताना कोणत्याही सबबी या अडथळा ठरू शकणार नाहीत. आपले प्रथम आणि अंतिम उद्दिष्ट आदिवासी विद्यार्थी व समाज हेच असले पाहिजे, असे प्रतिपादन केले.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार-२३४

### - नोटीस -

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मे. के.जी.आय. रियल्टी प्रा. लि. तर्फे श्री. अमित होतचंदानी | स.नं. २२, हि.नं. १ व स.नं. ११०, हि. नं. ५, प्लॉट नं. २ मौजे-उसरघर, डोंबिवली पूर्व, | १५ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |
| २ | मे. बिल्ट इन रियल्टी प्रथम तर्फे भागीदार श्री. विजय अभयसिंग राठोड | स.नं. ८०/१/११ मौजे-चिकणघर | ०३ | इमारतीच्या रस्त्यात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/११०
दि .५/५/२०२५


# वडिलांच्या उत्तरकार्याला झाडांचे वाटप

### मुलांनी दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : उत्तरकार्याला पै पाहुणे, नातेवाईक, मित्रमंडळींना भांडी किंवा कपडे वाटप करण्याची प्रथा आहे.या अनाठायी खर्चाला पायबंद बसला पाहिजे, चुकीच्या प्रथा पडू नयेत यासाठी उत्तरकार्यादिवशी भांडी, कपडे वाटपाला फाटा देत पर्यावरण संवर्धनाचा वसा घेत विविध जातींची २०० रोपे भेट देण्याचा विधायक उपक्रम शहापूर तालुक्यातील मलेगाव येथील जनार्दन पडवळ व अशोक पडवळ यांनी वडील जयराम पडवळ यांच्या उत्तरकार्य कार्यक्रमावेळी राबवण्यात आला.

दरम्यान पर्यावरणाचे बिघडत असलेले संतुलन, वाढते तापमान, घटते पर्जन्यमान, जमिनीची होत असलेली धूप, खोलवर जात असलेली भूजल पातळी हे शेतशिवारातील घटत चाललेली झाडांची संख्या तसेच कमी होत असलेले वनक्षेत्र यांचेच दुष्परिणाम आहेत.पर्यावरण संतुलनासाठी ३३ टक्के क्षेत्र वनाखाली असणे आवश्यक आहे. आपल्या राज्यात मात्र हे प्रमाण २० टक्के सरकारी आकडेवारीनुसार सांगितले जाते. प्रत्यक्षात ते प्रमाण १५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे यातील जाणकार सांगतात. पर्यावरण असंतुलनाचे सर्व दुष्परिणाम कमी करावयाचे असतील तर वृक्ष लागवड आणि त्यांचे संगोपन हाच परिणामकारण उपाय आहे. केवळ वन जमिनी, शासकीय पडीक जमिनी, रस्त्याच्या दुतर्फा यावरच झाडे लावून चालणार नाही तर शेताचे बांध, शेतकऱ्यांकडील पडीक जमीन, खासगी पडीत क्षेत्र यावरसुद्धा वृक्ष लागवड केल्यास झाडांची संख्या वाढून त्याचे अपेक्षित परिणाम दिसू लागतील.

**झाडे आपल्या संरक्षणासाठी आवश्यक आहेत.या वर्षात प्रचंड उष्णता तसेच पूर आणि चक्रीवादळांमुळे झालेल्या विनाशा याचा थेट संबंध पर्यावरणाशी येतो.जैवविविधता राखण्यासाठी झाडे खूप आवश्यक आहेत.परिणामी माती आणि भूजलाचे आरोग्य सुधारून ते अधिक वाढीसाठी पर्यावरणाचे पोषण करतात.किंबहुना वृक्ष लागवड ही काळाची गरज झाली आहे.यासाठी एक सामाजिक चळवळ उभी राहणे अत्यावश्यक आहे.– दर्शन ठाकुर,वनपरीक्षेत्र अधिकारी,धसई.**

# केडीएमसी आयुक्तांची मान्सूनपूर्व आपात्कालीन बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर, 'योग सर्वांसाठी' हे ध्येय पुढे ठेवत केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालया अंतर्गत, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना सेल,आरोग्य योगा व नॅचरोपॅथी सेंटर,जीवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एस एस टी महाविद्यालय आणि जीवनदीप महाविद्यालय यांच्या आयोजनातून ५० दिवसीय योग क्रांतीकारी उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने संपन्न





झाले

. यावेळी बोलताना पाटील यांनी सांगितले की, " योग ही भारताची प्राचीन परंपरा असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नातून तो आता जागतिक स्तरावर पोहोचला आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत योग पोहोचवण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे."

या प्रसंगी मुरबाड-बदलापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र व गोवा क्षेत्रीय संचालक प्रमुख अजय शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष - राज्य संपर्क अधिकारी महाराष्ट्र शासन डॉ. निलेश पाठक, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ओएसडी प्रा. सुशील शिंदे, तसेच ठाणे जिल्हा समन्वयक व एसएसटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. जीवन विचारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य योगा आणि नॅचरोपॅथी सेंटरचे संस्थापक डॉ. विजय कुकरेजा यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. जीवन विचारे यांनी केले. आभार प्रदर्शन विभागीय समन्वयक प्रा. नीरज मिश्रा यांनी केले. संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांपासून नागरिकांपर्यंत योगाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचा उद्देश असलेल्या या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

# माळशेज घाटामधील रस्ता डांबरीकरण कामाला सुरूवात

## आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशनच्या मागणीला यश





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण माळशेज घाट आळेफाटा राष्ट्रीय महामार्ग वरील पडलेल्या खड्डयांमुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाली होती. हा राष्ट्रीय महामार्ग आहे कि नाही अशी स्थिती होती. या रस्ता दूरूस्ती साठी १ मे रोजी रास्ता रोको करून आंदोलनाचा इशारा आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन वतीने दिल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने विभाग खडबडून जागे झाले व प्रथम खड्डे दूरूस्ती व नंतर प्रत्यक्ष माळशेज घाटातील संपूर्ण रस्ता डांबरीकरण शुभारंभ करण्यात आला. रस्ता डांबरीकरण शुभारंभाला मुरबाड आमदार किसन कथोरे उपस्थित होते. यावेळी स्फूर्ती फाउंडेशन महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी त्यांचे औक्षण करत स्वागत केले. तसेच आम्ही नगरकर प्रतिष्ठान व स्फूर्ती फाउंडेशन वतीने कार्याध्यक्ष बजरंग तांगडकर, जेष्ठ पत्रकार शिवचरित्र व्याख्याते शांताराम तांगडकर, संचालक शांताराम झावरे, संस्थेच्या वतीने पुणेकर -नगरकर टोपी परिधान करून, फटाके फोडत, पेढे वाटत आनंद साजरा करत आम्ही नगरकर व स्फूर्ती फाउंडेशन वतीने आभार मानण्यात आले.

# 'राष्ट्रीय पशुधन योजना' अंतर्गत पशुपालकांना लाभ देण्यासाठी सक्रिय पावले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत भारत सरकारच्या राष्ट्रीय पशुधन योजनेचा (National Livestock Mission) प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्रिय प्रयत्न सुरू आहेत. ही योजना पशुपालकांना व्यवसायिक दृष्टिकोनातून सक्षम बनविण्याचा उद्देश समोर ठेवून राबविण्यात येत आहे.

**योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे उपयोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे:**

1. पशुधन विकासासाठी वित्तीय सहाय्य

– कुक्कुटपालन, शेळीपालन, डुक्करपालन, दुभती जनावरे अशा विविध घटकांसाठी आर्थिक अनुदान व सवलती उपलब्ध.

– लाभार्थ्यांनी स्वत:च्या मालकीची जमीन अथवा इतर आवश्यक सुविधा दाखवणे बंधनकारक.

2. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

– अर्ज ah.mahabms.com या पोर्टलवरून सादर करता येतील.

– अर्ज भरताना आवश्यक कागदपत्रे (आधारकार्ड, बँक पासबुक, उत्पन्न दाखला, प्रकल्प अहवाल इ.) अपलोड करणे आवश्यक आहे.

– अर्ज प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व तंत्रज्ञानाधिष्ठित पद्धतीने पार पडणार आहे.

3. योजनेच्या प्रचारासाठी विशेष प्रयत्न

– गावपातळीवर जनजागृती मोहीम, पोस्टर व बॅनर्सद्वारे माहिती प्रसार.

– कृषी मेळावे, पशुपालक मेळावे आयोजित करून थेट संवाद.

– ग्रामसेवक, पशुधन पर्यवेक्षक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मार्गदर्शन.

4. लाभार्थ्यांची निवड व प्राधान्य

– अल्पभूधारक, महिला, अनुसूचित जाती-जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना प्राधान्य.

– निवड प्रक्रिया ऑनलाईन व पारदर्शक मार्गाने होणार आहे.

ठाणे जिल्ह्यात 2024-25 या आर्थिक वर्षात पशुधन व्यवसायासाठी अनेक लाभार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले असून, अधिकाधिक पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समिर तोडणकर यांनी केले आहे.

अर्ज करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ: https://ah.mahabms.com

मोबाईल ॲप: AH-MAHABMS (Google Play Store वर उपलब्ध)

# 'पुष्कळ अजुनी उणा, प्रभू, मी' भजन संध्या संपन्न





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून रेव्ह. नारायण टिळक यांच्या सुमधुर भजनाचा कार्यक्रम कल्याण पश्चिमेकडील रामबाग परिसरात असलेल्या गॉस्पल व्हिजन चर्च येथे सायंकाळी संपन्न झाला. भजनकार संगीता गोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'पुष्कळ अजुनी उणा, प्रभू, मी' या सारखी विविध मराठी ख्रिस्ती भजन सादर करत उपस्थितांकडून दाद मिळवली. यावेळी, माजी नगरसेवक राजू खेमा, माजी केडीएमसी सहाय्यक आयुक्त दिनेच वाघचौरे उपस्थित होते. या भजनसंध्याचे आयोजन विशाल दामले, मोनिका दामले आणि निस्सी दामले यांनी केले होते. तर या कार्यक्रमासाठी आशिष मोरे, संदिप कांबळे, यश मोरे, सोहन, प्रविण गुंजाळ आदींचे विशेष सहकार्य लाभले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई,संचलित

जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी (दळखण)

ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१(मुंबई विद्यापीठाशी संलग्न) ISO 9001 : 2005

विद्यार्थ्यांची स्वप्न अनेक पण स्वप्नपूर्तीचं केंद्र एक...

ADMISSION OPEN

११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT)

UNDER GRADUATION: B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BAF, B.Com, BAMMC, B.A.

POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com, M.A. मराठी, M.A. अर्थशास्त्र, M.A. समाजशास्त्र, M.A. भूगोल

For More Details Email - jeevandeepkhardi@gmail.com
Website- www.jsspcollegekhardi.in

8669244522, 9167043099
9923992390, 9619188558


# उन्हाळी सुट्टीतही शिक्षक व पालक तणावाखाली

### उशिरा घेतलेल्या परीक्षांमुळे ११वीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे शिक्षक विद्यार्थाच्या संपर्कात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शैक्षणिक सत्र 2024 - 25 मध्ये शिक्षण विभागाने अचानक परीक्षा उशिरा घेतल्यामुळे त्याचा परिणाम विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यावर होत आहे. दरवर्षी वार्षिक परीक्षा १० एप्रिल पर्यंत पूर्ण होत होत्या. त्यानंतर एप्रिल महिन्यातच इयत्ता दहावी वर्गाचे खाजगी शिकवणी वर्ग सुरू केले जात होते. सरासरी 1 मे पर्यंत पंधरा ते वीस दिवस दहावी वर्गाचे खाजगी शिकवणी वर्ग घेतल्यामुळे दहा मे नंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी भेटत होती. परंतु शिक्षण विभागाने उशीरा घेतलेल्या परीक्षामुळे यावर्षी खाजगी शिकवणी वर्ग दोन मे पासून सुरू झालेले आहेत. मे महिण्यात पूर्ण शिकवणी वर्ग चालू असल्यामुळे दहावीचे विद्यार्थी खाजगी शिकवणी वर्गाला जात असल्याने पालकांना सुट्टीचा आनंद घेता आला नाही.

तसेच पॅट परीक्षाचे ऑनलाईन नोंदणी करणे, निपूण भारत उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा स्तर उंचावण्यासाठी ऑनलाईन मार्गदर्शन करणे, त्याच्या नोंदी ठेवणे तसेच या वर्षी दहावीचे संभाव्य निकाल १६ मे रोजी लागणार असल्याने माध्यमिक शाळांतील वर्गशिक्षकांना अपेक्षित उन्हाळी सुट्टी मिळणार नसल्याची माहिती मिळाली आहे. निकालानंतर लगेचच मे महिन्यात ११वीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू होणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्ज भरणे, अर्ज पडताळणी, कॉलेज निवड, प्रवेश निश्चिती अशा अनेक टप्प्यांचा समावेश आहे. पहिला फॉर्म विद्यार्थी शाळेतून शिक्षकाचे मार्गदर्शनखाली भरतात. वर्गशिक्षकाला माहिती असल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांचे संपर्कात असतात. विद्यार्थ्यांना आवश्यक तांत्रिक सहाय्य करणे इत्यादी जबाबदाऱ्या शिक्षकांना पार पाडाव्या लागतात. म्हणून उन्हाळी सुट्टी असूनही शिक्षकांना सुट्टी असल्याचे जाणवत नाही. त्यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उन्हाळ्यात सुट्टी असून सुद्धा ताणावाखाली दिसत आहे.उन्हाळी सुट्टी असताना देखील अनेक शिक्षक सुट्टीत देखील कार्यालयीन कामकाजात गुंतले आसतात. त्यांना अपेक्षित विश्रांती व सुट्टी मिळणार नसल्याची शिक्षक भावना व्यक्त करत आहेत.

**उन्हाळी सुट्टी असताना देखील अनेक शिक्षक सुट्टीत देखील कार्यालयीन कामकाजात गुंतले आसतात. त्यांना अपेक्षित विश्रांती व सुट्टी मिळणार नसल्याची शिक्षक भावना व्यक्त करत आहेत. शिक्षक संघटनांकडून यावर नाराजी व्यक्त होत असून शिक्षकांना विश्रांतीची संधी मिळावी यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था करावी, याशिवाय आधीच शिक्षकांकडून निवडणूक ड्युटी, जनगणना, विविध सर्वेक्षणे, योजनांचे माहिती संकलन यांसारखी अनेक अशैक्षणिक कामे नियमितपणे घेतली जात असल्याने, शिक्षक मानसिकदृष्ट्या थकले आहेत. 'शिक्षक ही फक्त शैक्षणिक जबाबदारी पार पाडणारी व्यक्ती नसून, त्यांचाही मानसिकतेचा विचार होणे आवश्यक आहे. उन्हाळी सुट्टीत तरी शिक्षकांना विश्रांती द्यावी. – मनोज महाजन, उपाध्यक्ष, पुरोगामी शिक्षक संघटना ठाणे**

शिक्षक संघटनांकडून यावर नाराजी व्यक्त होत असून शिक्षकांना विश्रांतीची संधी मिळावी यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित

सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2025 -26

११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE

7719814142
9130580111

# बाप्पा निघाले परदेशी : पेणमधून ७ हजार मूर्ती रवाना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणेश उत्सवाला अजून काही महिन्यांचा कालावधी बाकी असताना मात्र यापूर्वीच लाडके गणपती बाप्पा परदेशी वारीला निघाले आहेत. परदेशात राहत असलेल्या भारतीयांकडून ठीक ठिकाणी गणेश उत्सव साजरा करण्यात येत असून यासाठी पेण मधून ७हजार गणेश मूर्ती ऑस्ट्रेलिया, दुबई ,दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडीज, कॅनडा, आदी ठिकाणी रवाना करण्यात आले आहेत.

गणपतीचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या पेणमध्ये गणेश उत्सवापूर्वीची लगबग सुरू झाली आहे केवळ महाराष्ट्रात, संपूर्ण देशात नव्हे तर पेणमधील गणेश मूर्तींना परदेशात मोठी मागणी असते. पेणमधून प्रतिवर्षी लाखोच्या संख्येने गणेश मूर्ती परदेशात पाठवल्या जातात यावर्षी या मागणीत वाढ झाली असून पेण मधून गणेश मूर्ती परदेशात रवाना होण्यास सुरुवात झाली आहे पेण मधील गणेश मूर्तींना मोठ्या प्रमाणात मागणी असून आत्तापर्यंत हजारोच्या संख्येत गणेश मूर्ती पाठवण्यात आले आहेत यंदाच्या उत्सवासाठी पहिल्या टप्प्यात सात हजार गणेश मूर्तींची रवानगी करण्यात आली असून मागणीनुसार गणेश मूर्ती पाठवण्यात येणार आहेत अशी माहिती गणेश मुर्ती कार यांनी दिली.

# ख्रिस्ती समाजातील लाखो लोक ख्रिस्ती धर्म त्यागण्याच्या विचारात

## दि इंडियन ख्रिश्चन असोसिएशन महाराष्ट्र संस्थापक नोवेल साळवे यांनी व्यक्त केली चिंता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : काही पिढ्यांपुर्वी ख्रिस्ती समाजातील प्रेम, सद्भावना, एकोपाच्या आकर्षणात ख्रिस्ती धर्म स्वीकारून जे लोक ख्रिश्चन झाले आज काही वैविचारी स्वार्थी धर्मगुरूंमुळे ख्रिस्ती समाजात ते प्रेम दिसत नसल्याकारणाने राज्यात आणि देशात ख्रिस्ती समाजातील लाखो लोक ख्रिस्ती धर्म त्यागण्याच्या विचारात असल्याची चिंता दि इंडियन ख्रिश्चन असोसिएशन महाराष्ट्र संस्थापक नोवेल साळवे यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी कार्डिनल जॉन रॅाडरिक्स, आर्च बिशप मुंबई व ख्रिस्ती धर्म प्रांत प्रमुख सर्व पंथाचे बिशप आणि धर्मगुरू, महाराष्ट्र, भारत यांना पत्र पाठवले आहे.

सध्या महाराष्ट्र सहीत संपूर्ण देशात ख्रिस्ती समाजात बर्याच पैकी बिशप आणि धर्मगुरूं बद्दल असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, कारण प्रभू येशू ख्रिस्ताच्या शिकवण प्रमाणें प्रेम हा ख्रिस्ती धर्माचा मुलभूत आधार आहे परंतु या धर्मगुरूंच्या स्वार्थी स्वभाव व वैविचारी वागणुकीमुळे ख्रिस्ती समाजातील बंधूभाव आणि आपआपसातील प्रेम हे संपुष्टात आले सारखे दिसून येत आहे. काही पिढ्यांपुर्वी इतर समाज आणि धर्मा मधून लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा हा एकमेव कारण होता की ख्रिस्ती धर्म हा सत्य आणि प्रेमावर चालणारा धर्म आहे, त्या आकर्षणामुळे लाखो लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारून ख्रिश्चन झाले परंतु आजच्या घडीला ख्रिस्ती समाजात ना सत्य राहीला आहे ना प्रेम राहीले आहे.

या सर्व गोष्टींचे मुळ कारण आहेत ते धर्मगुरू, धर्मगुरू हे चर्च मध्ये फक्त पवित्र बायबल चे उपदेश देण्यासाठी नसतात तर त्यांचे मुळ कर्तव्य आहे की त्यांनी चर्च मधील मंडळींना एकत्र करून त्यांच्या मध्ये एकमेकांबद्दल प्रेम आणि आपुलकी निर्माण करणे आहे. परंतु तसे न करता धर्मगुरू स्वताच्या स्वार्थासाठी चर्च मधील मंडळीं मध्ये फुट टाकून ठेवतात. या पलीकडे जाऊन पाहिले तर काही वरिष्ठ धर्मगुरू बिशप हे तर अक्षरश गपचूप धर्मप्रांत आणि चर्च ची मालमत्ता (प्रॉपर्टी) कोणालाही न कळवता विकत आहेत, जे मालमत्ता ख्रिस्ती समाजातील गोरगरीब लोकांच्या उपयोगासाठी या आधीचे प्रामाणिक बिशप आणि धर्मगुरूंनी मोठ्या कष्टाने साठवून ठेवले होते तेच मालमत्ता आजचे हे बिशप आणि धर्मगुरू विकून संपूर्ण ख्रिस्ती समाजाला बदनाम करून कमजोर करण्याचा काम करत असल्याचा आरोप नोवेल साळवे यांनी केला आहे.

तरी वेळीच ख्रिस्ती धर्मातील सर्व धर्म पंथांचे बिशप आणि धर्मगुरू यांनी आपले आचरण बदलावे आणि नैतिकतेची पालन करत येशू ख्रिस्ताच्या शिकवण वर चालून ख्रिस्ती समाजातील लोकांची सेवा करावी, अन्यथा देशातील संपूर्ण ख्रिस्ती समाज विखुरले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी चिंता नोवेल साळवे यांनी व्यक्त केली आहे.

Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
**Arts, Commerce and Science College Goveli**
Tal - Kalyan, Dist - Thane Pin-421 301.
Permanently Affiliated to University of Mumbai
NAAC Grade - B
**Arts, Commerce and Science College, Khardi**
Tal - Shahapur, Dist - Thane Pin-421 601.
Affiliated to University of Mumbai
NAAC Grade - B
**Arts, Commerce and Science College, Mhasa**
Tal - Murbad, Dist - Thane Pin-421 401.
Affiliated to University of Mumbai
**Application are invited for the following posts for the Academic Year 2025-2026**
(All Un - Aided)

| Sr. No. | Cadr | Subject | Total No. of Posts | College Wise Vacancies | | | Posts Reserved |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | GOVELI | KHARDI | MHASA | |
| 1 | Assistant Professor | English | 08 | 03 | 03 | 02 | SC-10 |
| 2 | Ass.Professor | Marathi | 04 | 01 | 02 | 01 | ST - 05 |
| 3 | Ass. Professor | History | 03 | 02 | - | 01 | VJA - 02 |
| 4 | Ass. Professor | Economics | 08 | 04 | 03 | 01 | NT - B-02 |
| 5 | Ass. Professor | Philosophy | 02 | 01 | 01 | - | NT - C- 02 |
| 6 | Ass. Professor | Geography | 04 | 02 | 02 | - | SBC - 02 |
| 7 | Ass. Professor | Sociology | 04 | 01 | 02 | 01 | EWS - 07 |
| 8 | Ass. Professor | Political Science | 02 | 02 | - | - | OBC - 19 |
| 9 | Ass. Professor | Commerce | 11 | 05 | 02 | 04 | OPEN - 43 |
| 10 | Ass. Professor | Chemistry | 10 | 04 | 03 | 03 | --------- |
| 11 | Ass. Professor | Physics | 05 | 02 | 02 | 01 | 92 |
| 12 | Physical Director | Maths | 07 | 03 | 02 | 02 | (Out Of above |
| 13 | Ass. Processor | Librarian | 02 | - | 01 | 01 | Postes 02 |
| 14 | Ass. Processor | Sports | 03 | 01 | 01 | 01 | posts |
| 15 | Ass. Processor | Management | 04 | 04 | - | - | will be |
| 16 | Ass. Processor | Mass Media | 06 | 03 | 03 | - | reserved |
| 17 | Ass. Processor | Information Technology | 09 | 05 | 04 | - | for PWD |
| | Total | | 92 | 43 | 31 | 18 | 92 |

**Conditions :-**
1. Open posts open for all however candidate from any category can apply for the post.
2. Educational Qualification and other requirements are as prescribed by UGC notification dated 18 July 2018 Govt of Maharashtra Resolution no misc 2018/C-R56/18 UNI-1 dated 8th march 2019 and as per University circular
3 A relaxation of 5% shall be allowed at the candidates belong to SC/ST/OBC (Non Creamy layer)/ differently abled for the purpose of eligibility and assessing good academic record fo direct recruitment.
4. Reserved candidate who are domiciled out of Maharashtra State, will be treated as open candidate.
5. Application received after the date will be not considered. The Sanstha will not be responsible for postal delay if any.
6. Reservation for PWD, woman and Disable Person will be as per govt. norms.
7. Reserved category candidate shall produce the caste validity certificate as per the directives issued by the state Govt. vide circular No. BCC.201/Pra.kra.1064/2011/168 dated 12-12-2011
8. Reserved category candidates (exceptSC/ST) shall produce Non-Creamy layer certificate at the time of interview
9. Reservation for VJNT categories is internally transferable.
10. Applicants who are in service must send their application though proper channel.
11. Applicant are required to account for break, if any in their academic career.
12. T.A./D.A. will not be paid for attending the interview.
13. Incomplete applications will not be entertained.
14. All the Terms & conditions are applicable as mentioned in the GR dated 18-10-2023 from Higher and Technical Education Department of Govt. of Maharashtra.
15. Application with full details should reach **the president Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's Art's Commerce and Science College Goveli, Tal. Kalyan, Dist. Thane - 421 103. or on Email :- jeevandeepappointment@gmail.com within 15 days from the date of publication of this advertisement.**

Place : Goveli
Date :

Sd/-
President
Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
Tal. Kalyan, Dist. Thane

## श्रीनिवास गडकरी यांना कोकण साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : ललित कला केंद्र ह्या साहित्य, कला क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत असणाऱ्या नामांकित संस्थेच्या वतीने आपल्या पेबल्स सोसायटीतील ज्येष्ठ सदस्य,साहित्यिक,कवी श्रीनिवास गडकरी ह्यांना पनवेल येथे जेष्ठ साहित्यिक कारखानीस, ऐ. के. शेख, तुकाराम पाटील यांच्या उपस्थितीत कोकण साहित्य रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.श्री गडकरी ह्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# ऐन रखरखत्या उन्हाळ्यात पदपथा लगतच्या झाडाची छाटणी कोणाच्या हितासाठी ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ऐन उन्हाळ्यात उन्हाचा चटका आणि अंगाची होणारी काहिलीपासून झाडाच्या सावलीत थांबल्यावर क्षणभर तरी हायसे वाटते. परंतु कल्याण पश्चिमेतील आग्रा रोड परिसरातील पदपथालगतच्या झाडाची छाटणी कुणाच्या हितासाठी केली असा संतापजनक सवाल नागरिकांकडून होत आहे.




कल्याण पश्चिम मध्ये आग्रा रोड येथे नवीन कल्याण ज्वेलर्स नावाने नवीन शोरुम सुरू करण्यात आले आहे. हे शोरुम स्पष्ट दिसावे म्हणून त्या शोरुम समोरील जुन्या झाडाची छाटणी लगबगीने करण्यात आली. धोकादायक झाडाची छाटणी करण्यासाठी अर्ज आदी स्पोस्कर केले तरी पाठपुरावा केला तरच प्रशासन छाटणीचे काम मार्गी लावते. असे असतानाच मात्र संदर्भीत परिसरातील उन्हाळयात सावली देणार्या झाडाची छाटणी कोणाच्या हितासाठी झाली असा सनसनाटी आरोप दक्ष नागरिकांकडून यानिमित्ताने होत आहे.

या वृक्षाच्या छाटणी संदर्भात परवानगी प्रश्न उपस्थित झाला असून छाटणी अंती उरलेला झाडाचा ढाचा गायब झाल्यास याला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित होत आहे. त्यावर कारवाई करणार का असा प्रश्न नागरिकांना पडला असून केडीएमसी प्रशासन याकडे लक्ष ठेवणार का असा सवाल पर्यावरण प्रेमी करीत आहेत. या संदर्भात केडीएमसी वृक्ष प्रधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता माहिती दिली की, महावितरणने संदर्भीत झाडाची छाटणी केली आहे.

# मुरबाड ग्रामीण भागातील वाळवणाच्या पदार्थांना चांगलीच मागणी


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात तसेच आदिवासी पट्ट्यात घरच्या घरी काही महिला एकत्र येऊन पापड मिरगुटी, चकल्या, साबुदाणा वडे, कुरड्या बनवतात तसेच बचत गटामार्फत घरगुती पापड, मिरगुटी, कुरड्या खारोड्या तयार करीत त्यांची विक्री करीत आहेत या मागणीला ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात मागणी वाढते त्यामुळे त्या मागणीमुळे महिला वर्गाला दररोज रोजगार मिळत आहे.

ग्रामीण भागात पावसाच्या आधी मुरबाड तालुक्यातील आदिवासी तसेच ग्रामीण व शहरी भागात दररोज महिला बचत गटामार्फत विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात असले तरी खरा उपक्रम मुरबाड तालुक्यात पापड, मिरगुटी, कुरड्या, खारोड्या, साबुदाणा वडे हे बनवणे ठरला जात आहे त्यामुळे या उद्योगातून अनेक महिलांना दररोज रोजगार मिळत आहे.तसेच अनेक वर्षापासून हा पापड उद्योग ग्रामीण भागात चालत आहे. त्यामुळे शहरी भागातील नागरिक सुद्धा ग्रामीण भागात बनवलेले घरगुती पापड,मिरगुटी, चकल्या, साबुदाणा वडे, कुरड्या, विकत घेण्यासाठी ग्रामीण भागात येतात.

आजही तंत्रज्ञानाच्या युगात मुख्य ग्रामीण भागात अगोटीचे साहित्य भरण्यात येते कडधान्यसह डाळी,पापड, कुरड्या,आदी साहित्य उन्हाळयाच्या दिवसात खरेदी करीत ते कडक उन्हात ठेवत असत त्याला वाळवणे म्हणतात.

बदलत्या काळात हे साहित्य रोजच मिळत असल्याने शहरात या संस्कृतीचे प्रकार कमी दिसत असले तरी ग्रामीण भागात अजय वाळवण पद्धत टिकून आहे किंवा जपली जात आहे.



महिला वर्ग घरातच पापड कुरड्या बटायचे वेफर सारखे पदार्थ पावसाळयासाठी तरतूद करताना पाहायला मिळत आहे पापड, कुरड्या, तांदळाच्या फेण्या, साबुदाणा, बटाट्याच्या वेफर बनविण्यासाठी उन्हाळयाचा हंगाम उपयुक्त ग्रामीण भागात मानला जातो. घातलेली पापड, कुरडयांची मालवण म्हणजे अंगणाची शान वाढविणारी ठरतात तर शहरी भागातही वाळवंट करताना गच्ची, गॅलरीचा आधार घेतात घेतला जातो हा पदार्थ जेवणात लज्जत आणणारा ठरतो. यावेळी वर्षभरात येणाऱ्या उपवासाकरताही साबुदाणा फेण्या बनवल्या जातात.

कारण या काळात ते वाळतात चांगले आणि वर्षभर टिकतातही

खास करून ग्रामीण भागात ऐसपैस अंगणात वाळत विविध पदार्थाचा समावेश असायचा हे पदार्थ वर्षभराची वेगळी असायचे आणि या बेगमीसाठी घरातल्या महिला तर आपली इतर कामावरून झटायच्याच, पण बेगमीच्या तयारीला लागलेले असायचे.

**महिलांना मिळतो रोजगार**

उन्हाला म्हटला की घरामध्ये वाळवणयाच्या पदार्थाचा घाट घातला जायचा त्यात पापड, कुरड्या, वडे, मिरच्या, शेवया, फणसाचे गरे अशा गावातील घरांमध्ये स्वतःपुरता का होईना नागलीचे पापड, नाचणीचे, उडदाचे पापड, साबुदाण्याच्या पापड्या आणि चकल्या वगैरे बनवण्यात येतात व हे पुढच्या वर्षभर साठी केली जाणारी बेगमी म्हणजे साठवणूक असते,ही पद्धत महिलांनी आजही जपून ठेवली आहे.अशी माहिती ग्रामीण भागातील ग्रहणी भाग्यश्री भालेराव यांनी दिली आहे.

तसेच मुरबाड कल्याण या राष्ट्रीय महामार्ग असलेल्या शिवसागर व समर्थ हॉटेलमध्ये सुद्धा तुम्हाला ग्रामीण भागात बनवलेले पापड, कुरड्या, चकल्या, खारोड्या, नाचणीचे पापड सुद्धा विक्रीसाठी उपलब्ध असतात चांगले विशेषता ग्रामीण भागात महिला वर्गांना विविध प्रकारचे पापड चकल्या खारोड्यापासून चांगला रोजगार मिळत असल्याने महिलावर्गांनी याबाबत समाधान व्यक्त केला आहे.

घरगुती पापड, कुरड्या, चकल्या ,साबुदाणा वडे या पदार्थांना चांगली चव असते.उन्हाळयात तयार केलेले पदार्थ उदाहरणार्थ पापड कुरडया, चकल्या, साबुदाणा वडे, खारोडया हे वर्षभर टिकतात यालाच पावसाळयाची बेगमी म्हणतात.शहरी भागातील नागरिक सुद्धा घरगुती पापड, कुरडया, मिरगुटी यांना चांगली पसंती देताना दिसत आहेत.

- भाग्यश्री भालेराव गृहीणी,कोरावळे/मुरबाड

## मॉडेल महाविद्यालयाचा बारावीचा ९८.०४ टक्के निकाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : केरलीय समाज डोंबिवली मॉडेल महाविद्यालयाचा बारावीचा निकाल 98.04 टक्के लागला आहे. यामध्ये विज्ञान 97.05 टक्के, आर्ट्स व कॉमर्स 100 टक्के निकाल लागला. आर्ट्स मध्ये किस्टीन संतोष याला 85.83 टक्के कॉमर्समध्ये दर्शी प्रकाश भगत - 93.05 टक्के व सायन्स मध्ये तन्वी त्रिभुवन - 86.17 टक्के गुण मिळाले.

याबाबत मॉडेल महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल आर बांबरडेकर म्हणाले, आमच्या महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल उत्तम असेल अशी खात्री होती त्यानुसार विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे. आमचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग यांचे सहकार्य मिळाल्याने मॉडेल कॉलेज नेहमीच प्रगतीचे शिखर गाठत असते.

मॉडेल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एच एस सी परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल केरळी समाज (रजि) डोंबिवली व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वासू इ. पी., उपाध्यक्ष सुरेंद्रन नायर एम. बी., चेअरमन वर्गीस डॅनियल, व्हाइस चेअरमन राजीवकुमार एस., सरचिटणीस राजशेखरन नायर, वित्त सचिव बिनॉय थॉमस, डॉ. भास्करन के एम, सुरेश बाबू के. के., मनोजकुमार व्ही. बी., गिरीश कुमार नायर, श्यामला के. नायर, मुरलीधरन नायर यांच्यासह शिक्षकवृंदासह मॉडेल कॉलेजच्या कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## शहापूरातील भूमी अभिलेख कार्यालयाने राबविला
# शासनाचा शंभर दिवस विशेष उपक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : राज्य सरकारच्या संकल्पनेतून शासकिय कार्यालयात शंभर दिवस विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शहापूर येथील उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात उपअधीक्षक शरद काळे यांनी हा शासनाचा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याचे दिसून येत असल्याने त्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे .

या उपक्रमांतर्गत नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांबाबत उपअधीक्षक शरद काळे यांनी माहिती देताना सांगितले की,शहापूर तालुका भूमी अभिलेख कार्यालयात अनेक नावीन्यपूर्ण सुधारणा करण्यात आल्या असून यामध्ये नागरिकांसाठी अद्यावत सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता गृह आणि नीटनेटके कार्यालय, कामकाज माहिती फलक, वृक्ष लागवड, नागरिकांसाठी बसण्यासाठी व्यवस्था, कार्यालयात कर्मचारी बैठक व्यवस्था, कर्मचाऱ्यांच्या नावाचे फलक लावण्यात आले आहेत.तसेच नागरिकांसाठी कार्यालयीन मोजणी अर्ज भरणे व नगर भूमापन कंदील नावे लावणे व इतर कामकाज हे पूर्णपणे ऑनलाईन झालेले आहे. त्यामुळे जनतेने कार्यालयात येऊन फेऱ्या मारण्याची गरज राहिली नाही. मोजणी प्रकरणांचा ऑनलाइन तारखा मिळत असून नगरभूमापन मिळकत पत्रिका चावडीवाचनाचा कार्यक्रम खर्डी व मोखावणे येथे विशेष शिबिर लावून घेण्यात आला. यावेळी नागरीकांना सर्व प्रकारचे भूमी अभिलेख विभाग अंतर्गत विविध कामकाज व सुविधाबाबत सर्व माहिती व्यंकटेश आगलावे परिरक्षण भूमापक यांनी दिली

तालुक्यात मुख्यमंत्री शंभर दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत आदिम वस्ती स्थानाचे २६ प्रकरणात जमीन मोजमापाचे विशेष नियोजन करून दोन दिवसात मोजणी करून आदिवासी बांधवांचा प्रश्न मार्गी लावला आहे. तसेच आदिवासी बांधव खातेदारांना प्रत्येक मंगळवारी दुपारी सर्व प्रकारचे कार्यालयीन कामा करिता विशेष कर्मचारी नेमणूक करण्यात आला असून त्यांना कार्यालयीन कामात काही तक्रार असल्यास whtasap no. उपलब्ध केला असून तसा फलक लावणेत आलेला आहे त्या माध्यमातून जनतेच्या तक्रारीचे निरसन होत असल्याचेही उपअधिक्षक काळे यांनी सांगितले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024